नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २७६ Issue - 276 | वार शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५ Blow- Saturday Date 22 February 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### भोंदूबाबाने महिलेस फसवले; ३६ हजार ५०० रूपयांचा गंडा ; गुन्हा दाखल

सोलापूर : तुम्हाला मल्हारी खंडोबा आहे असे म्हणून फिर्यादीकडून रोख रक्कम दीड हजार तसेच गळ्यातील मनी मंगळसूत्र घेऊन महिलेची फसवणूक केल्याची घटना १९ फेब्रुवारी रोजी पावणे एकच्या सुमारास घडली. याप्रकरणी निर्मला नागनाथ कन्नीकर (वय-४६,रा. वेणुगोपाल नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात भोंदूबाबाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी व फिर्यादीची सासू हे घरात झोपले होते. यावेळी अज्ञात इसम पांढरे कपडे घालून गळ्यात कवड्याच्या माळा होत्या. गळ्यात लक्ष्मीचा फोटो अडकविला होता. त्यावेळी त्या इसमाने फिर्यादीस तुम्हाला मल्हारी खंडोबा आहे ना असे विचारल्यावर फिर्यादी हो म्हणाल्या. यावेळी संशयित भोंदूबाबांने फिर्यादीला तुम्ही लक्ष्मीची घरात पूजा करा बरकत येईल, पैसा घरात येईल असे सांगितले. त्या पूजेसाठी ११ हजार रुपये लागतील. यावेळी फिर्यादीने माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत म्हणून दीड हजार रुपये दिले.तेव्हा भोंदूबाबाने पूजेला जुने काही सोने असेल तर ते द्यावे.यावेळी फिर्यादीने सासूच्या गळ्यातील मनी मंगळसूत्र पूजासाठी काढून दिले.वरील संशयित आरोपीने फिर्यादीची व फिर्यादीच्या सासूची दिशाभूल करून सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम असे अप्रमानिकपणे घेऊन फिर्यादीची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# मराठी भाषा ही अमृताहूनी गोड

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली आज जागतिक मातृभाषा दिवस आहे. तुम्ही दिल्लीतील साहित्य संमेलनासाठी दिवस सुद्धा अतिशय चांगला निवडला आहे. मी जेव्हा मराठी भाषेबाबत विचार करतो. तेव्हा मला संत ज्ञानेश्वर महाराजांची एक ओवी आठवते. माझ्या मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके, म्हणजे मराठी भाषा ही अमृताहूनी गोड आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रति माझं प्रेम आहे. मी मराठी बोलण्याचा प्रयत्न नेहमी केला आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

दिल्लीत आजपासून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सुरुवात झाली आहे. या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलं आहे. या संमेलनासाठी मराठी सारस्वतांची मांदियाळी दिल्लीत जमली आहे. देश व विदेशातील



साहित्य रसिकही मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ.तारा भवाळकर आहेत. तसेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार व प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित आहेत. मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन पार पडल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी भाषण करताना आपल्या भाषणाला मराठीत सुरुवात केल्याचं पाहायला मिळालं. मराठी सारस्वतांना माझा नमस्कार, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीत भाषणाला सुरुवात केली.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ.तारा भवाळकर यांचं भाषण झालं. तेव्हा मी म्हटलं की फारच छान, तर त्यांनी मला गुजरातीमधून उत्तर दिलं. मला पण गुजराती अवडायची असं त्या म्हणाल्या. देशाच्या आर्थिक राजधानीमधून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व सारस्वतांना माझा नमस्कार, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठी केली.

मराठी साहित्याच्या या संमेलनात महाराष्ट्राची सांस्कृतिक विरासत आहे. ग्यानबा तुकारामांच्या मराठीला आज राजधानी दिल्ली अतिशय मनापासून अभिवादन करत आहे. ग्यानबा तुकारामांच्या मराठीला आज राजधानी दिल्ली अतिशय मनापासून अभिवादन करत आहे. पहिल्या आयोजनापासून आतापर्यंत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा देश साक्षी राहिला आहे. महादेव गोविंद रानडे, हरिनारायण आपटे, माधव श्रीहरी अणे, वीर सावरकर, देशातील अनेक महान व्यक्तींनी या संमेलनाची अध्यक्षता स्वीकारली आहे. आज शरद पवार यांच्या आमंत्रणावरून मला या गौरवपूर्ण परंपरेबरोबर जोडण्याचं भाग्य मिळालं, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

मराठी साहित्य संमेलन अशा वेळी होत आहे, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष पूर्ण झाले आहेत. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे ३०० वर्ष पूर्ण झाले आहेत. तसेच आपल्याला या गोष्टींचा गर्व आहे की महाराष्ट्राच्या धर्तीवर १०० वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची सुरुवात झाली होती. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक वटवृक्षाप्रमाणे आपले १०० वर्ष साजरे करत आहे. वेदांपासून ते स्वामी विवेकानंद यांच्यापर्यंत भारताच्या परंपरा आणि संस्कृती नव्या पिढींपर्यंत पोहोचवण्याचं काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गेल्या १०० वर्षांपासून करत आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.



## मला एखादा माणूस दाखवून द्या की, जो विटाळाच्या स्थानातून जन्माला आला नाही : संमेलनाध्यक्ष डॉ. भवाळकर

नागपूर: आजही एखादा म्हणतो की, माझा जन्म जैविक नाही वगैरे म्हणणाऱ्यांवर आपण किती विश्वास ठेवायचा? असा प्रश्न करत संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी पंतप्रधान मोदींचे नाव न घेता अप्रत्यक्ष टीका केली. तब्बल सात दशकांनी देशाची राजधानी दिल्ली येथे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यानंतर दुसऱ्या उद्घाटन सत्रात संमेलनाध्यक्ष डॉ. भवाळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोचऱ्या शब्दात टीका केली आहे.

संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की, शिवला तर विटाळ होतो आणि दुसरा स्त्रीचा. निसर्ग धर्माने दिलेली मासिक पाळी तिची! त्यालाही विटाळच म्हणायचं. आता ही बाई कुठल्याही शाळा, कॉलेजात गेली नाही, कुठल्याही स्त्री मुक्तीवालीकडे गेली नाही, तिला कुठली 'सिमोन दि बोव्हा' माहिती नव्हती. ती काय म्हणते ? 'देहाचा विटाळ, देहीचं जन्मला, शुध्द तो जाहला कवण प्राणी।। उत्पत्तीचे मूळ विटाळाचे स्थानं। कोण देह निर्माण नाही जगी।।' असा मला एखादा माणूस दाखवून द्या की, जो विटाळाच्या स्थानातून जन्माला आला नाही.

आता आजही एखादा म्हणतो की, माझा जन्म जैविक नाही वगैरे, त्याच्यावर आपण किती विश्वास ठेवायचा हा वेगळा विषय आहे. परंतु, त्याचा भंडाफोड या आमच्या संत कवयित्रींनी १३ आणि १४ व्या शतकातमध्ये केला आहे. ज्यावेळेला लिपी आणि लिहिण्यावाचण्याला त्यांच्या जीवनात स्थान नव्हतं. स्त्री मुक्तीच्या उद्गात्या आणि झेंडा फडकवणाऱ्या म्हणायचं की नाही? म्हणजे आजच्या स्त्री मुक्तीच्या विचारांना मागे सारतील अशाप्रकारचे विचार आमच्या या स्त्रियांनी, संत स्त्रियांनी निरनिराळया जातजमातीच्या स्त्रियांनी त्यांच्या साहित्यातून मांडल्या आहेत. त्या जातीच्या स्त्रिया ज्यावेळेला बोलतात त्यावेळेस त्यांची विचारशक्ती, प्रतिभाशक्ती आणि संवेदनशीलता, भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व या सगळ्या किती मोठ्या गोष्टी आहेत असेही संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या. प्रतिभा ही महिलांमध्ये उपजत निर्मितीच्या दृष्टीने ज्याला आपण कला म्हणत असतो ती कला म्हणजे दुसरं काय असतं ? संवेदनशीलता नेमक्या शब्दात उतरवणं, याच्यासाठी जी प्रतिभा लागते, ती प्रतिभा या बायकांच्याजवळ उपजत आहे. आणि ती अनुभवातून परिपक्व झालेली आहे. ह्यांच्याकडे आम्ही या सबंध इतिहासाच्या प्रवाहामध्ये लक्ष देणार आहोत की नाही ? असा हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

## महाराष्ट्र आणि दिल्लीचे राजकीय अन् सांस्कृतिक संबंध : शरद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दिल्लीत आजपासून सुरुवात झाली. या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलं. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ.तारा भवाळकर आहेत. तसेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार आणि प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार हे शेजारी बसल्याचं पाहायला मिळालं. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक केलं. तसेच महाराष्ट्र आणि दिल्लीचे राजकीय अन् सांस्कृतिक संबंध असल्याचंही शरद पवार यावेळी म्हणाले.



मराठी माणूस केवळ महाराष्ट्रातच नाही तर मराठी माणसांनी अटकेपार झेंडा फडकवला आहे. दिल्ली, हरियाणा, इंदोर, गुजरातमधील अनेक शहरात देखील मराठी माणूस दिसतो. मराठी साहित्याचा अनुभव घेण्यासाठी आपण आज यमुनेच्या तिरावर जमलो याचा मला आनंद आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीत दुसऱ्यांदा होत आहे. या साहित्य संमेलनाला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील उपस्थित राहिले याचा मला आनंद आहे. हे साहित्य संमेलन मराठी भाषेच्या दृष्टीने महत्वाचं आहे. महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्रातील साहित्यिक आणि रसिक या सर्वांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून पाठपुरावा केला आणि अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी महत्वाची भूमिका बजावली त्याबद्दल मी त्यांच्याबाबत कृतज्ञता व्यक्त करतो, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दिलेल्या सवलतींमुळे एसटी तोट्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या आधी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचं सरकार सत्तेत असताना राज्यातील सर्व महिलांना एसटी महामंडळाच्या बसच्या प्रवासासाठी ५० टक्के सवलत अर्थात अर्धे तिकीट देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ही सवलत सध्याही महिलांना मिळते. तसेच जेष्ठ नागरिकांना देखील एसटी प्रवासात सवलत देण्यात येते. मात्र, या सवलती संदर्भात राज्याचे परिवहन

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे विधान

मंत्री प्रताप सरनाईक यांनी एक मोठं विधान केलं आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दिलेल्या सवलतींमुळे एसटी तोट्यात गेली असल्याचं मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.



दरम्यान, राज्यातील महिलांना बसच्या प्रवासात पन्नास टक्के दिलेल्या सवलतीमुळे एसटीला आर्थिक तोटा सहन करावा लागणार असल्याची टीका विरोधकांकडून सातत्याने करण्यात आली. मात्र, महायुतीच्या अनेक नेत्यांनी एसटीला फायदा होत असल्याचं म्हटलं होतं. तसेच या योजनेमुळे एसटीला तोटा होणार नसल्याचं वारंवार महायुतीच्या नेत्यांनी स्पष्ट केलं होतं. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमधील राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाला दिवसाला ३ कोटींचा तोटा होत असल्याची थेट कबुलीच दिली आहे.

एसटी महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये सवलत मिळाली, आता आमच्या बहिणींना ५० टक्के सवलत, तसेच जेष्ठ नागरिकांनाही बसमध्ये वर्षांला सवलत आणि त्या सवलतींमुळे परिस्थिती अशी झाली की एसटी बस दरदिवशी तब्बल ३ कोटी रुपये तोट्यात आहे. आपण सर्वांनाच सवलत देत बसलो तर मला असं वाटतं की एसटी महामंडळ चालवणं कठीण होईल. त्यामुळे सध्या तरी मी याचा विचार करू शकत नाही, असं प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे.

'यापुढे नवीन सवलत दिली जाणार नाही'

दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एका कार्यक्रमात बोलताना महिलांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सूट दिल्यामुळे आणि जेष्ठ नागरिकांना दिलेल्या सवलतींमुळे एसटी महामंडळाला आर्थिक तोटा होत असल्याचं स्पष्ट केलं आहे. याचवेळी आता यापुढे एसटीत कोणत्याही प्रकारची नवीन सवलत मिळणार नाही, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे. एवढंच नाही तर अशा प्रकारच्या सवलती दिल्या तर एसटी महामंडळ चालवणं कठीण होईल असं सूचक विधानही त्यांनी केलं. दरम्यान, प्रताप सरनाईक यांच्या विधानामुळे एसटीच्या प्रवासात महिलांना दिली जाणारी सवलत बंद होणार नाही ना? याबाबत उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत.

### पंतप्रधान मोदींच्या कृतीने सभागृहात टाळ्यांचा कडकडाट

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर

# आधी खुर्चीवर बसवलं, नंतर शरद पवारांना पाण्याचा ग्लास दिला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दिल्लीत आजपासून सुरुवात झाली आहे. या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलं. या संमेलनासाठी मराठी सारस्वतांची मांदियाळी दिल्लीत पाहायला मिळाली. या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ.तारा भवाळकर आहेत. तसेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार आणि प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार हे शेजारी बसल्याचं पाहायला मिळालं. याच





कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदींनी शरद पवारांना खुर्चीवर बसण्यासाठी मदत केल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नव्हे तर आदराने पाण्याचा ग्लास देखील भरून दिला. या संदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमात आधी शरद पवार यांनी भाषण केलं. भाषण केल्यानंतर शरद पवार पुन्हा व्यासपीठावरील आपल्या खुर्चीवर येऊन बसले. मात्र, शरद पवार यांना खुर्चीवर बसण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मदत केल्याचं पाहायला मिळालं. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांना खुर्चीवर बसण्यासाठी मदत केली तेव्हा सभागृहातील उपस्थितांनी जोरदार टाळ्या वाजवल्याचं पाहायला मिळालं.

तसेच शरद पवार भाषण करून आल्यानंतर आणि खुर्चीवर बसल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: बाटलीतील पाणी ग्लासात घेऊन शरद पवार यांना दिलं. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या कृतीचे सर्वांनी कौतुक केलं आणि सभागृहात उपस्थित असलेल्या सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवल्या.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना अनेकदा पाहायला मिळालं आहे. मात्र, तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शरद पवार यांची दोघांमधील मैत्री अनेकवेळा दिसून आली आहे. याचाच प्रत्येय आज दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमातही पाहायला मिळाला आहे.

## संपादकीय....

### सवलतींवर आक्षेप

राज्यातील महिलांना बसच्या प्रवासात पन्नास टक्के दिलेल्या सवलतीमुळे एसटीला आर्थिक तोटा सहन करावा लागणार असल्याची टीका विरोधकांकडून सातत्याने करण्यात आली. मात्र, महायुतीच्या अनेक नेत्यांनी एसटीला फायदा होत असल्याचं म्हटलं होतं. तसेच या योजनेमुळे एसटीला तोटा होणार नसल्याचं वारंवार महायुतीच्या नेत्यांनी स्पष्ट केलं होतं. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमधील राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाला दिवसाला ३ कोटींचा तोटा होत असल्याची थेट कबुलीच दिली आहे. एसटी महामंडळाच्या सर्व बसेसमध्ये सवलत मिळाली, आता आमच्या बहिणींना ५० टक्के सवलत, तसेच जेष्ठ नागरिकांनाही बसमध्ये वर्षाला सवलत आणि त्या सवलतींमुळे परिस्थिती अशी झाली की एसटी बस दरदिवशी तब्बल ३ कोटी रुपये तोट्यात आहे. आपण सर्वांनाच सवलत देत बसलो तर मला असं वाटतं की एसटी महामंडळ चालवणं कठीण होईल. त्यामुळे सध्या तरी मी याचा विचार करू शकत नाही, असं प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एका कार्यक्रमात बोलताना महिलांना एसटीच्या प्रवासात ५० टक्के सूट दिल्यामुळे आणि जेष्ठ नागरिकांना दिलेल्या सवलतींमुळे एसटी महामंडळाला आर्थिक तोटा होत असल्याचं स्पष्ट केलं आहे. याचवेळी आता यापुढे एसटीत कोणत्याही प्रकारची नवीन सवलत मिळणार नाही, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे. एवढंच नाही तर अशा प्रकारच्या सवलती दिल्या तर एसटी महामंडळ चालवणं कठीण होईल असं सूचक विधानही त्यांनी केलं. दरम्यान, प्रताप सरनाईक यांच्या विधानामुळे एसटीच्या प्रवासात महिलांना दिली जाणारी सवलत बंद होणार नाही ना? याबाबत उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत.

# मराठी भाषेचा वापर वाढवावा...




भाषा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भाषेशिवाय आपल्याला जगताच येणार नाही. मग ती भाषा शब्दांची असो, डोळ्यांची असो किंवा हावभावांची असो.तिच्याद्वारेच आपण आपल्या भावना, विचार व्यक्त करत असतो. या भाषेत मातृभाषेला जास्त महत्त्व आहे. भाषा माणसाने निर्माण केली. तिला चिन्ह, त्याला अर्थ माणसांनी दिले .त्यामुळे हजारो भाषा निर्माण झाल्या. त्यातील एक भाषा म्हणजे आपली मराठी. तिला २००० वर्षाचा इतिहास आहे. तिच्यातील शिलालेख , ताम्रपट, लिखित साहित्य आजही उपलब्ध आहे. संत ज्ञानेश्वरांनी तिची तुलना अमृताची करून तिला अमृता पेक्षा सरस आणि मधुर ठरवलेले आहे आणि त्यामुळेच या भाषेचं वेगळेपण आपण लक्षात घेतलं पाहिजे. भाषा आपल्याला आईसारखीच असते. मराठी इतकी समृद्ध भाषा फार कमी आहेत. मराठीचे वेगळेपण अनेक प्रकारे सिद्ध करता येते.

मराठी भाषेत जवळजवळ ४८ काव्याचे प्रकार आहेत. ज्या भाषेत आपल्या सगळ्या भावना विचार नेमकेपणाने व्यक्त करता येतात ती भाषा समृद्ध मानली जाते. मराठी अशी समृद्ध भाषा आहे. अगदी एखाद्या क्रियापदाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने केला तर त्याचा अर्थ बदलत जातो उदाहरणार्थ भरणे.. या क्रियापदाचा वापर जसा तुम्ही कराल तसा त्याचा अर्थ बदलत जातो. नळाचे पाणी भरणे, मनात एखादी व्यक्ती भरणे, कान भरणे, लक्ष्मी पाणी भरणे, जखम भरणे, अंगाने भरणे, वगैरे वगैरे.. प्रत्येक भरण्याचा अर्थ वेगळा अर्थच्छटा वेगळ्या. मराठी भाषेला काना, मात्रा, वेलांटी, स्वल्पविराम ,पूर्णविराम ,असे अनेक चिन्हे आहेत. यांच्या माध्यमातून ती भाषा अधिक सुंदर दिसते. मराठी भाषा संपन्न व समृद्ध आहे पण दुर्दैवाने आज मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषा महत्त्वाची ठरत आहे.

इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यामुळे आपण मुलांचे किती नुकसान करत आहोत हे आज आपल्या लक्षात येणार नाही. एक तरी भाषा परिपूर्ण रित्या आली तर दुसऱ्या भाषा पटकन शिकता येतात. अलीकडे मुलांचे एकाही भाषेवर प्रभुत्व नसते .त्यामुळे त्यांना आपल्या भावना, विचार व्यक्त करताना नेमके शब्द सापडत नाहीत. हा अनुभव आहे. इंग्रजीमध्ये बोलले म्हणजे आपल्याला कोणीतरी मोठे असल्यासारखे वाटते. पण भाषा ही ऐकून येत असते. घरात वेगळी भाषा, शाळेत वेगळी भाषा, समाजात वेगळी भाषा. असे असेल तर त्या मुलांना कोणत्याही एका भाषेत नीटपणे आपले विचार व्यक्त करता येत नाहीत. उलट आपली जी मातृभाषा असते त्यातच आपण जर शिकलो तर आपल्याला भविष्यात कुठेही अडचण येत नाही. इंग्रजी भाषा फक्त अगदी उच्च पदावर असणाऱ्या व परदेशी जाणाऱ्या व्यक्तींनाच उपयोगी पडू शकते. उलट मातृभाषेबरोबर प्रादेशिक भाषा जरी शिकल्या तर त्याचा जास्त उपयोग होईल. आपले म्हणणे जर योग्य रीतीने मांडता आले नाही तर त्या व्यक्तीची घुसमट होते. अशा मुली, मुले आत्मकेंद्री व एकलकोंडी होतात. ते चार लोकांत मिसळू शकत नाहीत .त्याचा परिणाम त्यांच्या करिअरवरही होतो. मराठी भाषा इंग्रजी पेक्षा निश्चितच संपन्न व समृद्ध आहे. या भाषेचं वेगळेपण अनेक बाबतीत आहे. त्यामुळे मराठीचे सौंदर्य अधिक खुलून दिसते.

आपली मराठी भाषा आपणच टिकवली पाहिजे. त्यात आवर्जून बोलले पाहिजे. त्यातील भाषिक सौंदर्याचा लाभ घेतला पाहिजे. मराठीतील म्हणी, वाक्प्रचार अतिशय सुंदर आहेत. मराठी भाषेची विशेषणे सुद्धा खूप छान आहेत. उदा. लुसलुशीत पोळी, खुसखुशीत करंजी, ठणठणीत तब्येत , चटपटीत मिसळ, गुटगुटीत बाळ, चुणचुणीत मुलगी.. असे कितीतरी विशेषणे सांगता येतील.

मराठी भाषेचा उपयोग रोजच्या व्यवहारात सुंदर रीतीने केला पाहिजे.. आता अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे संपन्न होत आहे आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला आहे.. मराठी भाषा अभिजात आहेच.. परंतु ती आता जगन्मान्य झाली आहे.. या भाषेतील समृद्ध साहित्य आता इतर भाषेतही अनुवादित होईल.. मराठीचे क्षेत्र विस्तारत जात आहे.. फक्त अलीकडे बोलीभाषेचा वापर कमी होऊन प्रमाण भाषेचा वापर जास्त होत आहे.. त्यामुळे बोली भाषेतील अनेक म्हणी, वाक्प्रचार काळाच्या ओघात नष्ट होत आहे. अशी भाषा बोलणारी माणसंही कमी झाली आहेत.. मोबाईलमुळे किंवा मीडियामुळे प्रमाण भाषेचा वापर होत आहे.. परंतु तोही शुद्ध स्वरूपात नाही.. कारण इंग्रजी व हिंदी भाषेचा प्रभाव येणाऱ्या पिढीवर अधिक होत आहे..

त्यामुळे मराठीचे मराठीपण टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवरच आहे. यासाठी मराठीतील साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत कसे जाईल आणि मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त कसा करता येईल, याचाच विचार करण्याची गरज आहे.. माहिती जनसंपर्क कार्यालय याविषयी जनजागृती करत आहे, ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे.. प्रत्येकानेच आपली भाषा जिवंत ठेवण्यासाठी त्याच भाषेत बोलले पाहिजे. लिहिले पाहिजे आणि त्या भाषेतील साहित्य वाचले पाहिजे.. भाषेत सतत परिवर्तन होतच असते. नवीन शब्द येतच असतात. पण सगळेच नवीन न स्वीकारता काही जुने शब्द, त्यातील गोडवा ही आपण जाणीवपूर्वक जपला पाहिजे.. मराठी भाषेचा वापर वाढवला पाहिजे तसा संकल्प आपण सगळेच करू यात..

**– प्रा. डॉ. श्रुती श्री. वडगबाळकर**
**सोलापूर..**

# श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा उत्साहात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी :

**या पूर्वी श्री लक्ष्मी माता भाकणुकी मध्ये महिला राज्य येणार म्हणून सांगितले होते तेव्हा इंदिरा गांधीच सरकार आले.सन्याशी राज्य येणार म्हणून सांगितले होते तेव्हा अटल बिहारी वाजपेयी सरकार आले. भगवा राज्य येणार म्हणून सांगितले होते. तेव्हा मोदी सरकार आले. यंदा मात्र खुर्चीवर सरकार स्पस्ट बहुमताने अजून बसले नसल्याने सरकार कोसळणार असून सूर्य मावळण्याची भागात उद्रेक होऊन दंगा पेटणार असल्याची भाकणुकीत सांगितले आहे.**

यंदा देशात खरीप हंगामातील पाऊस चांगला असुन रब्बी हंगामात मात्र पाऊस कुठ होईल कुठ नाही यामुळे पिकाची नासाडी होईल. खुर्चीवर सरकार स्पस्ट बहुमताने अजून बसले नसल्याने सरकार कोसळणार असून सूर्य मावळण्याची भागात उद्रेक होऊन दंगा पेटणार असल्याची श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणुकीत सांगितले आहे.

तालुक्यातील बोरी उमरगे येथे श्री लक्ष्मी माता थंडी यात्रा भाकणुक अनादी काळापासून चालत आलेली असून आज पर्यंत भाकणुक खरे ठरत आले आहे. यंदा ज्वारीला तुरी पेक्षा जास्त भाव मिळणार असून व्यापाऱ्यांना ज्वारी मिळणे मुश्किल होईल. कांद्याला एकदम कमी भाव मिळणार असून शेतकऱ्याला फुकट फेकून द्यावा लागेल.लाला रंगांचे धान्याला व लसुणाला जास्त भाव मिळणार असून मिरची महाग होऊन स्वस्त होईल. सोनेचे भाव अजूनही वाढणार आहे. शेळी मेंढी महाग झाल्याने जेवण्याऱ्याला मटण मिळणे मुश्किल होईल.म्हशीचे संख्या कमी होत असल्याने दूध महाग होणार असून दूध मिळणे मुश्कील होईल. मुलांना लग्न जमवतना मुलगी मिळणे अवघड होणार असून रोगराई वाढल्याने जनतेला जीवन जगणे मुश्किल होणार आहे. बैल, म्हैस, शेळी, महागणार असून ज्यांचेकडे बैल तोच खरा शेतकरी अन्यथा बरेच जमीन पडिक पडणार आहे.कापड साडी वैगेरे मोठ्या प्रमाणात स्वस्त होणार आहे. यावेळी महारष्ट्र कर्नाटक सीमा भागातील कलबुर्गी, विजापूर,सोलापूर, उस्मानाबाद या जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.या भाकणुक यात्राचा उमरगे, मैंदर्गी, मिरजरगी, रामपूर, हत्तीकणबस कंठेहल्ली, संगोळगी (आ) चिक्केहल्ली या पंचक्रोशीतील भाविक भक्तच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली होती.

# शिवजयंती निमित्त जायफळ येथे रक्तदान शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील जायफळ येथे १९ फेब्रुवारी रोजी अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .जायफळ येथील रक्तदान शिबिरात गावातील ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक आदर्श घालून दिला.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी .काका भोंग,प्रकाश भोंग,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,. प्रसाद भैय्या पाटील राजमुद्रा ग्रुपचे, वैभव भोंग, श्रीकृष्ण भोंग यांच्या पुढाकारातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान हेच श्रेष्ठदान आहे असा संदेश दिला. जायफळ येथील शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने समाज उपयोगी



कार्यक्रम दरवर्षी गावामध्ये साजरे केले जातात ,शिवजयंती समितीच्या वतीने विविध सामाजिक ,लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते.

जायफळ येथील रक्तदान शिबिरात ,स्वस्त राशन धान्य चालक,सुर्यप्रकाश पवार सतीश जंगाले ग्रामपंचायत सदस्य ,बळीराम भोंग, प्रदीप गोरे, गोविंद जगताप, महेश ढोरमारे, भैरू ढोरमारे, श्रीकृष्ण भोंग, गोपाळ गायकवाड, अजिंक्य पाटील ,पवन ढोरमारे, किरण प्रकाश भोंग, किरण राम भोंग, आबासाहेब नंदराम, किरण भोंग, वसंत मगर ध्वज गोरे ,वैभव भोंग, व्यंकट जंगाले, अनिकेत जंगाले, अजित बालाजी भोंग, अविनाश भोंग, इब्राहिम शेख, सलीम शेख, रामहरी जगताप यांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान केले. सदर भव्य रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी गावातील अनेक तरुणांनी व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला ....




# देवगिरी किल्ल्याची प्रतिकृती तयार करून पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात शिवरायांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रभान रेवगडे, सदस्य धनंजय रेवगडे केशव रेवगडे,प्रल्हाद रेवगडे,मुख्याध्यापक एस.बी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाने व रेवगडे टी. के.यांच्या संकल्पनेतून विद्यालयात देवगिरी किल्ल्याची प्रतिकृती बनविण्यात आली हा किल्ला अतिशय अवघड असल्याने तो बनवणे मोठे अवघड होते.

रेवगडे टी.के. यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी एक महिना मेहनत घेऊन या किल्ल्याची प्रतिकृती विद्यालयात बनविली. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या कामी प्रोत्साहन दिले .विद्यार्थ्यांना आपल्या कल्पकतेने नवनवीन किल्ले साकारण्याचे आश्वासन दिले.सर्वप्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले असून छ. शिवाजी

**पाताळेश्र्वर माध्यमिक विद्यालयात शिवजयंती साजरी**

महाराजांची आरती झाली.यावेळी .शुभम जाधव,श्रुती जाधव, प्रतिक्षा शिंदे,सार्थक शिंदे,अनुजा रेवगडे,अंकिता कडाळे,स्वरांजली पाटोळे,स्नेहल वाघ,दर्शन वारुंगसे,अनुज शिंदे,नंदन रेवगडे,ईश्वरी रेवगडे,श्रावणी जाधव,माया रेवगडे,शौर्य शेलार,समर्थ शेलार,ज्ञानेश्वरी वारुंगसे,साक्षी सहाणे,राणी शिंदे,श्रावणी.रेवगडे,या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व व गीत गायन केले.

यावेळी मुख्याध्यापक एस.बी देशमुख यांनी आपल्या मनोगतात शिवरायांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निकम आर.व्ही.यांनी केले तर आभार सौ.सविता देशमुख यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक रेवगडे टी.के.बी. आर.चव्हाण, आर.व्ही.निकम,एस.एम. कोटकर,आर.टी.गिरी,एम.एम.शेख,सी.बी. शिंदे,के.डी.गांगुर्डे,एस.डी.पाटोळे, आर.एस. ढोली, ए.बी.थोरे उपस्थित होते.

# स्वेरी फार्मसीच्या संशोधन प्रकल्पाला पाच लाखांचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन (आर.जी.एस.टी.सी.) कडून स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीला 'डेव्हलपमेंट ऑफ टॉपिकल ड्रग डिलिव्हरी सिस्टीम फॉर ट्रीटमेंट ऑफ सोरायसिस' या विषयावरील संशोधन प्रकल्पाला पाच लाख रुपयांचा संशोधन निधी मंजूर झाला आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.बी. पी. रोंगे यांनी दिली.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी अंतर्गत असलेल्या 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट' अर्थात संशोधन विभागामार्फत मुख्य संशोधक डॉ. वृणाल विश्वासराव मोरे व सहाय्यक संशोधक प्रा.प्रदीप अविनाश जाधव यांनी 'डेव्हलपमेंट ऑफ टॉपिकल ट्रक डिलिव्हरी सिस्टीम फॉर ट्रीटमेंट ऑफ सोरायसिस' या




विषयावर आपले संशोधन प्रस्ताव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशनकडे सादर केले होते.

सदर प्रस्तावाला राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशनच्या पियर रिव्ह्यू कमिटीकडून शिफारस मिळाली असून त्यांना सोलापूर विद्यापीठाने देखील मान्यता दिलेली आहे. सदर संशोधन प्रकल्प हा 'सोरायसिस' या गंभीर त्वचा रोगावर 'नोव्हेल ड्रग डिलिव्हरी सिस्टीम'च्या सहाय्याने 'फॉर्म्युलाशन डेव्हलपमेंट' या संकल्पावर आधारित आहे ज्यामध्ये विशिष्ट ठिकाणी आणि विशिष्ट दराने औषध सोडण्याची समस्या दूर करण्यासाठी 'नॅनो पार्टिकल्स'चा वापर करून त्याद्वारे रुग्णांना औषध वितरण करण्यात येते. या पद्धतीचा वापर केल्यामुळे कन्व्हेन्शनल (पारंपरिक) ड्रग डिलिव्हरीमुळे होणारे नुकसान व औषधाच्या अति वापराने होणारे दुष्परिणाम टाळता येणे आता शक्य होणार आहे.

'सोरायसिस हा एक त्वचारोग आहे ज्यामध्ये त्वचेवर खाज सुटते त्यामुळे त्वचेवर खवले युक्त ठिपके तयार होतात. याच्या व्यवस्थापन व उपचारासाठी या संशोधनाचा फायदा होणार आहे. संशोधन निधी मिळाल्यामुळे डॉ.वृणाल मोरे व प्रा.प्रदीप जाधव यांचे प्राचार्य डॉ.एम.जी मणियार, संस्थेचे सचिव डॉ.बी.पी रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

# डोहोळे ग्रामपंचायती मार्फत माझी वसुंधरा अभियानबाबत जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

वाढते प्रदूषण,वातावरणातील बदल यामुळे पर्यावरणाचे रक्षण होणे गरजेचे आहे त्या अनुषंगाने शासनाच्या नियमांचे पालन करून भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे मार्फत माझी वसुंधरा अभियान ५.० मार्फत बीज संकलन व बीज गोळा करणे, बांबू ,शेवगा, खस लागवड जन जागृती, कृषी कचरा जाळण्यासाठी बंदी करून त्याचे व्यवस्थापन करण्याबाबत , हॉर्न भोंगा,( ध्वनी प्रदूषण रोखण्याबाबत) जनजागृती करणे , प्लास्टिक कॅरीबॅग बंद, पर्यावरण पूरक (शाडूची माती) मूर्ती बसवणे व कृत्रिम तलावामध्ये मूर्ती विसर्जन करण्याबाबत जनजागृती, नूतनीकरण ऊर्जा स्रोतांचा व कार्बन उत्सर्जनाबाबत जनजागृती. आपत्ती व्यवस्थापना बाबत जनजागृती, वातावरण बदला बाबत जनजागृती डोहोळे,कोशिंबी,कळंबोली,आन्हे व सौर येथील गावातील नागरिकांना माहिती देण्यात आली असून ग्रामसभेत त्याबाबत ठराव पारीत करण्यात आला आहे. तसेच दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती निमित्ताने सर्व नागरीकांच्या उप-




स्थितीत याबाबत शपथ घेण्यात आली.व माझी वसुंधरा अभियानाबाबत अधिक माहिती देऊन,जनजागृती ग्रामपंचायत कर्मचारी यांचे मार्फत करण्यात आली.यावेळी गावातील नागरिक ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### हरेगाव येथील ज्ञानगंगा क्लासेसचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

औसा : औसा तालुक्यातील हरेगाव येथे शिवजयंतीचे औचित्य साधुन ज्ञानगंगा क्लासेस चे सर्वेसर्वा तेजस कोव्हाळे सर यांच्या संकल्पनेतुन हरेगाव येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते ,

ज्ञानगंगा क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा जयघोष करत घोषणा देत बालकलाकारांणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नामकरण सोहळ्याने कार्यक्रमाला सुरुवात केली व कार्यक्रमात शिवाजी महाराजांचे पोवाडे ,देशभक्तीपर गीत ,नृत्य,भाषणे, विद्यार्थ्यांनी सादर केली ,व उपस्थीतांची मने जिंकली यावेळी सरपंच संजय पवार , ,ज्ञानगंगा क्लासेसचे संचालक तेजस कोव्हाळे ,दगडू डोंगरे ,व्यंकट डोंगरे अरविंद मत्ते, सुरेश डोंगरे नरसिंग डोंगरे,सुरेश मुडबे , व्यंकट भुजबळ, सरलाउद्दीन शेख, सुधाकर डोंगरे, विश्वनाथ कोहाळे , काकासाहेब मोरे, दत्तू पवार, बीट अंमलदार शेख ,सरपंच रमेश पवार, शिवव्याख्याते तेजस पवार, नामदेव कोहाळे, संदिपान पवार, पांडुरंग गायकवाड, राजेंद्र कोहाळे, सुरेश डोंगरे सह हरेगाव गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# आवताडे शुगरच्या गळीत हंगामाची सांगता

## मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांचे उपस्थितीमध्ये उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आवताडे शुगर अँड डिस्टलरीज प्रा.लि.नंदूर या साखर कारखान्याचा २०२४-२५ या हंगामाचा सांगता समारंभ संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष मा. विष्णूपंत (बापु) आवताडे यांच्या शुभहस्ते, मंगळवेढा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांचे उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाला. गळीत हंगाम सांगता समारंभ निमित्त शेतकी विभागाचे आग्री ओव्हरसियर संजय फटे व त्यांचे सुविद्य पत्नी सौ. भारती फटे यांचे हस्ते सत्यनारायण महापूज्या करण्यात आली.

जिल्ह्यातील खाजगी कारखानदारीमध्ये इतर कारखान्यांच्या बरोबरीने शेतकऱ्यांना ऊस दर देण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच प्राधान्यता ठेवली आहे. आमदार समाधान आवताडे यांचे मार्गदर्शनाखाली व चेअरमन संजय आवताडे यांचे नेतृत्वात सर्व अधिकारी व कर्मचारी याचे सहकार्याने कारखान्याने चालू गळीत हंगामामध्ये ३,४२,३६३ मे.टन उसाचे गाळप केलेले आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त ऊस गाळप करून त्यांना योग्य तो भाव देण्यासाठी कारखाना प्रशासनाने नेहमीच प्रयत्नशील असते. पुढील गळीत हंगामामध्ये चालू वर्षापेक्षा अधिक जोमाने कारखाना चालवून जास्तीत जास्त ऊस गाळप करण्याचा मनोदय कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांनी व्यक्त करून चालू वर्षाचा गळीत हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सर्व खातेप्रमुख, अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी, ऊस वाहतुक ठेकेदार व ऊसतोड कामगार यांचे त्यांनी अभिनंदन करून सर्वांचे आभार मानले.

सदर गळीत हंगाम सांगता समारंभ प्रसंगी विक्रमी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांचा व उच्चाकी ऊस पुरवठादार शेतकऱ्याचा मा. विष्णूपंत (बापु) आवताडे यांच्या हस्ते, तसेच कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, माजी संचालक भारत निकम, सरव्यवस्थापक (टेक्नीकल) सुहास शिनगारे, दामाजी शुगरचे माजी संचालक संजय पवार, मरवडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवाजी पवार, दामाजी नगरचे माजी उपसरपंच सुहास पवार, बबनराव आवताडे पतसंस्थ संचालक दादा ओमने, जितीचे माजी सरपंच नंदू जाधव यांच्या उपस्थितीमध्ये सन्मानित करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी डिस्टीलरी मॅनेजर संभाजी फाळके, चिफ केमिस्ट मोहन पवार, चिफ अकोंटंट बजीरंग जाधव, एच आर मॅनेजर डी. बी. बळवंतराव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, ऊस विकास अधिकारी वैभव नागणे, ईडीपी मॅनेजर निलेश रणदिवे, केनयार्ड सुपरवायझर सुधाकर पाटील, प्रोडक्शन मॅनेजर अभिजित पवार, सुरक्षा अधिकारी चंद्रकांत राठोड, असिसुरक्षा अधिकारी रणजीत पवार आदी मान्यवर सहकारी तसेच सर्व कारखाना प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी, खाते प्रमुख, कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**त्याच बरोबर ज्या ऊस उत्पादक शेतकरी यांनी आपल्या कारखान्यावर पूर्ण विश्वास ठेवून आपले कारखान्यास बापूराया रामगोंडा चौगुले -सिद्धापूर, सौ. सुजाता संजय पवार -घरनिकी, महादेव बयाजी व्हनमाने -देवळे, दिलीप औदुंबर कोळी -उचेठाण, विठ्ठल बाबुराव पाटील -भंडारकवठे, नवनाथ गुरुनाथ आसबे -तामदर्डी, राहुल शिवराम गिड्डे -अर्धनारी, सागर आणासो खबाले -सिद्धापूर, तानाजी हरिबा चव्हाण - अरळी, महादेव आप्पासाहेब गुंड -बठाण, संदेश राजकुमार पाटील -विंचुर, चनगोंडा आण्णासाहेब बिरादार -सिद्धापूर, यांनी उच्चान्की ऊस पाठवला त्यांचे हि कारखाना प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला.**

**ज्या वाहन ठेकेदारांनी जास्तीत जास्त उस वहातुक करून कारखान्यास ऊस वाहतूक करणारे ट्रक्टर वाहन ठेकेदार सिद्ध महादेव ढगे, पैगंबर नबिसाब येड्रामी, संतोष लक्ष्मऊण सोलंनकर, बंडू काशिनाथ यादव व डंपिंग वाहन ठेकेदार मध्ये संभाजी बिरा लोखंडे अंबादास पांडूरंग लवटे, मलकु पाराप्पा बंडगर, दीपक विठ्ठल व्हरे याच बरोबर विशेष उत्तेजनार्थ बक्षिस दामजी शामराव बंडगर, दयानंद लक्ष्मण गरंडे, राजाराम तुकाराम मुकणे पुरवठा केल्याबद्दल त्यांचे कारखाना प्रशासनच्या वतीने शाल व श्रीफळ देवून सत्कार करून बक्षिस देण्यात आले.**

### लोकशाहीची पाळेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातच : डॉ. जीवन सरवदे

# राजेशाहीत प्रगल्भ लोकशाहीनुसार राज्यकारभार करणारे जगातील सर्वोत्तम व्यक्तिमत्व छत्रपती शिवाजी महाराज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती महोत्सवानिमित्त इंदापूर महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी वरील मत व्यक्त केले.



महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रतिमेचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे ,कार्यालयीन अधीक्षक अभिमन्यू भंडलकर , प्रा. अमोल मगर , प्राध्यापिका सुवर्णा जाधव , प्राध्यापिका तृप्ती राऊत , प्रा. नामदेव पवार , राहुल सरडे , तानाजी भोसले यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

डॉ.जीवन सरवदे म्हणाले की ,' छत्रपती शिवाजी महाराज हे राजा असून देखील लोकशाहीला लाजवेल असा राज्यकारभार करणारे जगातील थोर व्यक्तिमत्व आहेत त्यांना जयंती निमित्त मनापासून अभिवादन करतो .' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तानाजी कसबे यांनी केले. आभार प्रा. आत्माराम फलफले यांनी मानले.

# निफाड नागरी पतसंस्थेच्या व्हा.चेअरमनपदी मिनाताई सुरेश कुंदे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्व.शांतीलालजी सोनी निफाड नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालकांची बैठक संस्थेच्या सभागृहात संस्थेचे चेअरमन अशोक पोफळीया यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली . या बैठकीत संस्थेच्या व्हा.चेअरमनपदी सौ. मिनाताई सुरेश कुंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

स्व.शांतीलालजी सोनी निफाड नागरी सहकारी पतसंस्थेचे व्हा.चेअरमन हेमंत खडताळे यांनी ठरलेल्या रोटेशन पध्दतीनुसार आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. सदरचा राजीनामा संचालक मंडळाने मंजुर केल्याने नविन व्हा.चेअरमन पद हे रीक्त झाले होते.




सर्व संचालकांची महत्वाची बैठक संस्थेचे चेअरमन श्री. अशोक पोफळीया यांचे अध्यक्षतेखाली संस्थेच्या सभागृहात. दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. बोलविण्यात आली होती. यावेळी विहीत मुदतीत व्हा. चेअरमनपदासाठी मिनाताई सुरेश कुंदे यांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले.

त्यावर सुचक म्हणून पवन चोरडीया व अनुमोदक म्हणून हेमंत खडताळे यांनी सह्या केल्या आहे. मिनाताई कुंदे यांचे एकमेव नामनिर्देशनपत्र दाखल झाल्याने व ते निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकार अधिकारी सुनिता लोखंडे यांनी छाननीत योग्य व बरोबर असल्याने ते मंजुर केले व त्यांनी सदरची निवड बिनविरोध झाल्याची घोषणा केली. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून बँकेचे व्यवस्थापक चंद्रकांत वैद्य यांनी काम पाहीले. बैठकीस संस्थेचे संचालक पवन चोरडीया, संतोष आहेरराव, अंबादास गोळे, संपतराव कराड, भास्करराव ढेपले, हेमंत खडताळे, संजय लुंक्कड, शशांक सोनी,. सविता कापसे व बँकेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. मिनाताई कुंदे यांची बिविरोध निवड झाल्यानंतर त्यांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सौ. कुंदे यांचे निवडीबद्दल निफाड तालुक्यातील अनेक लोकप्रतिनिधींनी व हितचिंतकांनी अभिनंदन केले आहे.

# कवितेची निर्मिती प्रक्रिया या विषयावर कवी इंद्रजीत भालेराव यांचे व्याख्यान संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात मराठी साहित्य परिषद आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव यांचे कवितेची निर्मिती प्रक्रिया या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी केले. त्यांनी कवी इंद्रजीत भालेराव यांच्या साहित्यिक कार्याचा संक्षिप्त परिचय उपस्थितांना करून दिला.

आपल्या व्याख्यानात कवी इंद्रजीत भालेराव यांनी 'कविता कशी सुचते, तिची निर्मिती प्रक्रिया, शब्दांमागील भावना, प्रतिमा, रूपक, तसेच कवीच्या मनातील कल्पनांचे शब्दांमध्ये रूपांतर कसे घडते'. याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून या सत्राचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी तर आभारप्रदर्शन मराठी साहित्य परिषदेच्या पंढरपूर शाखेचे अध्यक्ष कल्याण शिंदे यांनी केले. या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, मराठी विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नाशिकमध्ये शिवजयंती निमित्ताने राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत पुष्परत्न आहिरे प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक शहरासह जिल्ह्यातील सर्व गावात शिवजयंती मोठ्या उत्साहात सर्वत्र विविध प्रकारच्या उपक्रमानी साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित... त्याच्या कार्याचा गौरवासाठी विद्यार्थ्यांनी भाषणे केली. महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, ढोलताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत विविध प्रकारच्या देखावा शोभायात्राने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत सौ.सोनाली आनंद आहिरे व प्रा.डॉ.आनंद रत्नाकर आहिरे, संचालक- आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी (नाशिक,कल्याण,पुणे) यांचा मुलगा पुष्परत्न,यास राष्टीय अबॅकस स्पर्धेत मेरिट मध्ये प्रथम आला. त्याने २९३ सेंकदामध्ये ५० प्रश्नापैकी ४९ प्रश्नाचे उत्तरे योग्य सोडविले.

काल १९ फेब्रुवारी २०२५ छत्रपती शिवाजी महाराजाच्या जयंतीनिमित्ताने नाशिक मध्ये बक्षीस वितरण सोहळा पार पडला,संपुर्ण ठिकाणाहून विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुष्परत्नचे आई,वडील व ज्योती सांगळे मॅडम पुष्परत्नला मार्गदर्शन लाभले.

पुष्परत्न हा रासबिहारी इंटरनॅशनल शाळेचा दुसरी मध्ये शिकणारा विद्यार्थी असून शाळेतही त्याचे अभिनंदन व कौतुक होत असून संपूर्ण स्तरांवरुन त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची दमदार कामगिरी

### देशी बनावटीचे पिस्टल जप्त

# पंढरपूर शहर पोलिसांची मोठी कारवाई; पंढरपूर शहरांमध्ये कमरेला पिस्टल लावून फिरणाऱ्या घेतली ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने दमदार धडाकेबाज कामगिरी केली आहे.

दिनांक २०/२/२०२५ रोजी पंढरीपूर गुन्हे प्रक्रीकरण पथकास मिळालेली माहिती अनुसार जुना दगडी पुन्हा जवळ नवीन पुलाच्या खाली गाळा नंबर तीन मध्ये एक इसम संशयितपणे वावरताना दिसला. त्यास पोलीस पथकाने पकडण्यात जात असताना तो पळून जात असताना पोलीस पथकाने गारडा घालून त्या जागेस पकडले. पकडलेला इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने नाव लखन चंद्रकांत ननावरे वय वर्षे ३५ रा. अंबाबाई पटांगण पंढरपूर तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर. असे सांगितले व पकडलेले इसमाची झडती घेतल्या असता कमरेच्या उजव्या बाजूला देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल मॅक्झिनसह मिळाले. पकडलेले इसमास परवाने बाबत विचारले असता नसल्याचे सांगितल्यास त्यास पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये आणून पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये गु.रा.११६/२०२५ भारतीय हत्यार कायदा १९५९ कलम३व२५ प्रमाणे व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम१३५ प्रमाणे फिर्याद दाखल केली आहे.




सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी, मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री डॉ. अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर श्री विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, पो.सा.ई. श्री राजेश गोसावी, फसं.पो.फौ. शरद कदम, संपोफौ. कल्याण ढवणे,पोह.३९८ सिग्मा गोडसे, पोह.३९६ सुरज हेंबाडे, पोह.२२१ प्रसाद औटी,पोह.१७८९ सचिन हेंबाडे,पोह.१२५५ विठ्ठल विभूते,पोश. शाही मंडे,पोश. २१९० समाधान माने,पो.को.१५१३ बजरंग बिचकुले,पोको.१९०४ निलेश कांबळे तसेच सायबर शाखेची सोलापूर ग्रामीण.पोशि. रतन जाधव यांनी काम केले आहे.

## थोडक्यात...



### सैनिक टाकळी मराठा वॉरियर्स ग्रुप तर्फे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

सैनिक टाकळी/ संजय चव्हाण

सैनिक टाकळी मध्ये मराठा वॉरियर ग्रुप तर्फे दरवर्षीप्रमाणे मागील १८ वर्षापासून पारंपारिक पद्धतीने शिवजयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाते. यावर्षी देखील या ग्रुपच्या माध्यमातून वेगवेगळे कार्यक्रम, महाप्रसाद व मिरवणुकीसाठी मर्दानी खेळ व धनगर ढोल, रथ, बग्गी आणण्यात आले होते. १७ फेब्रुवारी रोजी या मंडळाच्या वतीने कुमार विद्यामंदिर, कन्या विद्या मंदिर तसेच छत्रपती संभाजीनगर मधील शाळेमध्ये वह्यावाटप कार्यक्रम करण्यात आला. १८ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी भव्य रांगोळी स्पर्धा, तसेच संध्याकाळी चार वाजता मुला मुलींसाठी भव्य खुलागट मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती प्रतिमा पूजन व सजावट स्पर्धा देखील घेण्यात आल्या . १९ फेब्रुवारीला सकाळी आठ वाजता शिवज्योतीचे पन्हाळागड होऊन आगमन झाले त्यानंतर शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिषेक झाला सकाळी बारा वाजता छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे शिवजन्मोत्सव काळ व महाप्रसाद करण्यात आला. याचवेळी सामाजिक बांधिलकी म्हणून या ग्रुपने रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया शिबिर ,मोफत आरोग्य शिबिर देखील भरवले होते. या शिबिरांचा गावातील कित्येक नागरिकांनी लाभ घेतला. सायंकाळी सहा वाजता मंडळाच्या वतीने शिवकालीन मर्दानी खेळ व धनगरी ढोल रथ ,घोडे यांच्या सोबतीने शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली. २० फेब्रुवारी रोजी या मंडळाच्या वतीने अनाथाश्रम व वृद्धाश्रमाला भेट व मदत देखील करण्यात आली. या शिवजयंतीमध्ये मराठा वॉरियर्स ग्रुपचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते गावातील सर्व नागरिक यांचे सहकार्य लाभले.

# ...अन्यथा पाडकामावर स्थगिती आणणे हा एकमेव पर्याय

## घाटकोपर येथील जुन्या ओएनजीसी बिल्डिंगच्या पाडकामाच्या कंत्राटदाराला प्रदूषण नियंत्रण उपाययोजने संदर्भात एन विभागाने नोटीस देऊन ही कंत्राटदाराकडून सर्रासपणे नियमांचे उल्लंघन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/ केतन भोज : गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावलेला आहे.या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. तर काही दिवसांपूर्वी घाटकोपरमध्ये वाईट प्रदूषित हवेची नोंद झाली होती. गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावलेला आहे.या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.याआधीही काही भागात बांधकामे बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते.आणि नंतर उठवण्यात आले.गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावला असून मुंबईकरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.महानगरपालिका प्रशासनाने हवेचा दर्जा सुधारण्यासाठी विविध उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.दरम्यान घाटकोपर पश्चिम अमृत नगर येथील बँक ऑफ इंडिया समोर असलेल्या जुन्या पडीक ओएनजीसीच्या बिल्डिंग आता तोडल्या जात आहे.मात्र या पाडकामामुळे आणि संबंधित ठेकेदारच्या बेजबाबदारपणामुळे आजुबाजूच्या परिसरात धुळीचे वातावरण पसरले असून या भागातील हवा देखील प्रदूषित होत चालली आहे.तसेच हवेची गुणवत्ता ही ढासाळत चालली आहे.याशिवाय बाजूलाच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती आणि शाळा देखील असल्यामुळे स्थानिक नागरिक आणि शाळकरी मुले यांना या धुळीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे याठिकाणी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही ऐरणीवर येत आहे. तसेच धूळ नियंत्रणासाठी संबंधित पाडकामाचा कंत्राटदार यावर कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करताना दिसत नसून त्याचा बेजबाबदारपणा या सर्वाला कारणीभूत असल्याचे याठिकाणी दिसत आहे.पाडकामाच्या कंत्राटदाराकडून दिखाव्यापूरती याठिकाणी उपाययोजना केल्या गेल्या असल्या तरी त्या तुटपुंजी स्वरूपाच्या असल्याचे याठिकाणी दिसत आहेत.तसेच जरी या केंद्र सरकारच्या बिल्डिंग असल्यातरी संबंधित मुंबई महानगरपालिका एन विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी बेजबाबदार कंत्राटदारावर कारवाई करावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी संबंधित महापालिका एन विभागाला यासंदर्भात तक्रार केली होती.त्यानंतर संबंधित एन विभागाने पाडकामाच्या कंत्राटदाराला नोटीस ही दिली होती. परंतु बेजबाबदार कंत्राटदाराने पालिकेच्या नोटिसला केराची टोपली दाखवत,अजून ही तो सर्रासपणे प्रदूषण तसेच धूळ नियंत्रण रोखण्यासाठीच्या महापालिकेच्या नियमांचे उल्लंघन करत आहे.जर संबंधित पाडकामाच्या कंत्राटदाराला या उपयोजना संदर्भात गांभीर्यता लक्षात येत नसल्यास या पाडकामावर स्थिगिती आणण्यासाठी पुढे लोकशाही मार्गाने योग्यती पावले उचलावी लागतील असे केतन भोज यांनी सांगितले.

महापालिकेची प्रदूषण रोख्यासाठीची मार्गदर्शक तत्वे,त्यातील संबंधित मुद्दे

बांधकाम किंवा पाडकाम इमारतींना हिरवे कापड,ताडपत्री,ज्यूटने पूर्णपणे झाकून बंदिस्त करणे बंधनकारक.

कोणतेही बांधकाम पाडताना वरपासून खालपर्यंत संपूर्णतः ताडपत्री/ हिरवे कापड/ज्यूट शीटने झाकणे,प्रत्यक्ष पाडकाम करतेवेळी सातत्याने पाणी शिंपडणे किंवा फवारणी करणे आवश्यक.

बांधकाम किंवा पाडकामाच्या ठिकाणी तसेच बांधकाम साहित्य चाढवताना आणि उतरवताना सातत्याने पाण्याची फवारणी करणे.

बांधकामावर किंवा पाडकामावर प्रदूषण निरीक्षण प्रणाली आवश्यक.


धूळनियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक बांधकाम किंवा पाडकाम प्रकल्पाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे.सेन्सर आधारित वायूप्रदूषण संनिरीक्षण प्रणाली तैनात करणे.

राडारोडा वाहून नेणारी वाहणे पूर्णपणे झाकणे.वाहनांच्या चाकांवर पाणी फवारणी करून ती स्वच्छ करणे.

बांधकाम किंवा पाडकाम प्रकल्पाची नियमित तपासणी करणे व धूळ नियंत्रण न करणाऱ्यांवर कारवाई करणे.

धूळ नियंत्रणासाठी स्मॉग गन आणि वॉटर स्प्रिंकलर्स यांचा वापर करणे.

बांधकाम किंवा पाडकाम प्रकल्पांभोवती ३५ फूट उंचीचे धातूचे पत्रे किंवा आच्छादन उभारणे अनिवार्य





अंमलबजावणी न करणाऱ्यांवर काम थांबवण्यासाठी नोटीस देणे किंवा कामाचे ठिकाण सील करणे,यांसारखी कठोर कारवाई तत्काळ करणे.



# शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा ऑनलाईन सातवा टप्पा तात्काळ राबविण्याची राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : सुधाकर रणदिवे

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांची प्रक्रिया कालबध्द पध्दतीने माहे एप्रिल मे महिन्यात राबवली जाते मात्र लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने ती राबवली गेली नाही. ही प्रलंबित बदली प्रक्रिया पवित्र पोर्टल शिक्षक भरती पूर्वी राबवावी, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सेवाजेष्ठता ग्राह्य धरावी, प्रचलित बदलीचे ऑनलाईन पद्धतीचे बदली धोरण कायम ठेवावे, यापूर्वी फॉर्म भरलेल्या शिक्षकांना ऑनलाइन बदली प्रक्रियेत प्राधान्यक्रम बदलण्यास संधी द्यावी व जून २०२५ पात्र निकष लावून नव्याने पात्र होणाऱ्या शिक्षकांना ही आवेदन पत्र भरण्यास संधी उपलब्ध करून द्याव, वर्षानुवर्षे आपल्या कुटुंबापासून दूर असलेल्या,पती पत्नी वेगवेगळ्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या महिला/पुरुष शिक्षकांना कौटुंबिक न्याय द्यावा अन्यथा आपल्या न्याय हक्कांसाठी व संविधानिक मागणीसाठी आपल्या कुटुंबासह बदली प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांना घेऊन आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येईल..त्यामुळे दुर्लक्षित होत असलेल्या या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन ऑनलाइन बदली प्रक्रियेचे आदेश निर्गमित करावेत अशी आग्रहाची मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने ग्राम विकास विभागाकडे करण्यात आलेली आहे.याबाबतचे निवेदन ग्रामविकासमंत्री यांचे स्वीय सहाय्यक श्री नारायण गोरे यांना देण्यात आले.

निवेदनावर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजणे, राज्य प्रसिद्धीप्रमुख लहू राक्षे,राज्य पदाधिकारी सुखदेव भालेकर,पंकज काटकर, दयानंद जवळगावकर, बालाजी माळी, रवी गुट्टे ,भागवत पदकोंडे, पुरुषोत्तम मेहेत्रे, सुभाष सानप, संजय मळभागे, रामेश्वर कांदे, अनंत फुलसुंदर, राजेंद्र होले, सुरेश घुले, विजय बाचणे, मनीषा रासकर, गणेश अवचार, दिलीप गोरे आदी पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# सासवड येथील ऐतिहासिक शिवतीर्थावर विविध पक्ष संघटनेच्या वतीने शिवरायांना जयंती निमित्त मानवंदना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/ प्रतिनिधीः स्वराज्याचे पहिले छत्रपती , छत्रपती शिवाजी महाराज, यांच्या जयंतीनिमित्त सासवड येथील ऐतिहासिक शिवतीर्थावरील शिवरायांच्या अश्वरुढ पुतळ्या समोर नतमस्तक होऊन विविध पक्ष संघटनेच्या व शिवप्रेमींच्या वतीने, पुष्पहार अर्पण करुन, मानवंदना देऊन छत्रपतींना अभिवादन करण्यात आले. ता. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजे पासून, सासवड शहरासह पुरंदर तालुक्यातील विविध पक्ष संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सासवड येथील ऐतिहासिक शिवतीर्थावरील शिवरायांच्या अश्वरुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी गर्दी केली होती,

सासवड नगरपालिका व शिवश्रृष्ठी प्रतिष्ठान यांच्या वतीने पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप, यांच्या हस्ते शिवरायांना पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण माजी नगरसेवक अजित जगताप,विजय वढणे, माजी उपनगराध्यक्ष संजय जगताप, नंदकुमार जगताप, सागर जगताप, अनिल जगताप, विश्वजीत आनंदे, अँड सौरव वढणे, अभिजित जगताप , संदीप राऊत, प्रमोद धनावडे, राजाभाऊ जगताप , डॉ. प्रविण जगताप अमोल क्षिरसागर, मोहन चव्हाण आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते, शिवजयंतीचे औचित्य साधून, सहकार महर्षी दिवंगत चंदूकाका जगताप यांच्या संकल्पनेतून माजी आमदार संजय जगताप व खासदार सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसृष्टी उभारण्यात आली आहे, ही शिवसृष्टी आज लोकांसाठी खुली केली असल्याचे आमदार संजय जगताप यांनी सांगितलले.दिवसभरात कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, रिपाइं बहुजन हक्क परिषद यांसह विविध पक्ष संघटनेच्या वतीने शिवरायांना अभिवादन करण्यात आले.


# संजय गांधीं निराधार लाभार्थ्यांना पाच महिन्यापासून मानधन नाही; संबधित कार्यालयाचे दुर्लक्ष

बाराभाटी/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील निराधार योजनेच्या नागरिकांना गेल्या माहे जूलै महिन्यापासून मानधन अजिबात मिळाला नाही. अशाचत समोर दिवाळी आहे. त्यामुळे निराधारांची दिवाळी ही अंधारात जाईल ड असा प्रश्न निराधार लाभार्थी यांच्या समोर उभा आहे.

तालुक्यातील अनेक निराधार लाभार्थी आहेत, ज्यांना चर महिन्यापासून मानधन मिळाला नाही, अशा लाभार्थी वर्गांनी काय करावे ? कसे जीवन जगावे ? कशाप्रकारे आपल्या औषधांचा पुरवठा करावा? असा सवाल डोळ्यासमोर झालेला आहे.

**तहसील व बॅंक मारव्या लागतात चकरा**

इकडे शासनाचे व अधिकारी वर्गाचे अजीबात लक्ष नाही. निराधार योजना लाभार्थी हे मानधनासाठी तहसील कार्यालय अर्जुनीमोरगाव येथे दररोज ये जा करतात आणि बॅंक सभोवताली डी. बी. टी. झाली नाही. चकरा मारुन मारुन चपला झिवल्याचे लाभार्थी बोलतात.



आक्टोबर महिन्यापासून मानधन दिला नाही, औषधीसाठा संपला आहे. कसे जगावे ? कसे परिवाराचा आणि आपला संभाळ कसे करावा, असी समस्या निर्माण झाली आहे.

**– हविद्रं वासुदेव तागडे ( निराधार लाभार्थी, येरंडी-बाराभाटी)**

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९४ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिपादन

# बुद्ध तत्त्वज्ञानामुळे जग युद्धापासून दूर व शांततेच्या जवळ येईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे बुद्ध तत्त्वज्ञानामुळे जग युद्धापासून दूर व शांततेच्या जवळ येईल. या डॉ. आंबेडकरांच्या विधानाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर ९४ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा १६ फेब्रुवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी.बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, बुद्ध तत्त्वज्ञानात मानवीय विकास अंतर्भूत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात त्याचे आचरण केले पाहिजे. करिता जगातील सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील सामायिक मानवतावादी मूल्यांची जोपासना केली पाहिजे. जेणेकरून समाजाला सुद्धा मानवतावादाकडे वळविता येईल. परिणामी समतामुलक समाजाची निर्मिती करता येईल. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे या विचारांच्या उद्देशपूर्तीसाठी बुद्धिष्ट सेमिनरी चालविली पाहिजे. त्यातून पुढे आलेल्या विचाराला समाज जीवनात रुजविण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. यांच्या अंमलबजावणीसाठी जीवनाच्या विविध क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पदावर याच विचारांच्या व्यक्ती असणे आवश्यक आहे. म्हणून तर बाबासाहेब आंबेडकरांनी १६ फेब्रुवारी १९४६ ला मा-याच्या जागा काबीज करा असा संदेश दिला होता. त्यावर गांभीर्याने विचार करण्याची आजतरी नितांत गरज आहे. जेणेकरून २५ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, माणसामाणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. म्हणून जगाला युद्धापासून परावृत्त करण्यासाठी समतेवर



आधारित समतामुलक समाजाची निर्मिती करावी लागेल. जेणेकरून जगात शांतता प्रस्थापित होईल. ती टिकविण्यासाठी याच विचारांच्या व्यक्ती मा-याच्या जागेवर विराजमान केल्या पाहिजेत.

समाज जीवनात स्वतःला बुद्धाचे अनुयायी म्हणणा-या व्यक्ती सुद्धा आचरण मात्र ब्राह्मणवादाचे करीत असतात. म्हणून तर ब्राह्मणवाद फोफावत चालला आहे. तरी गैर राजनीतिक मूळ मजबूत करण्यासाठी आपण समाज जीवनात प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

प्रमुख वक्ते प्रा. अरुण कांबळे म्हणाले की, योद्धे फितूर होत असल्याने चमचा युग उदयास आले आहे. म्हणून लोकशाहीच्या चारही स्तंभावर बुद्ध तत्त्वज्ञानाने प्रभावीत असणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती केली पाहिजे. चंद्रकांत हंडोरे यांनी त्यांच्या कार्य काळात आंबेडकर भवन बांधण्याची प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रात राबविली. तशी प्रतिके निर्माण करण्यासाठी आपण सुद्धा सजग राहिले पाहिजे. सप्त्यात महाराज ब्रेनवाश करतात. जग बुद्धाला स्विकार करीत असले, तरी मात्र आपल्या देशातील नागरिकांना बुद्ध माहित पडू दिले जात नाही. ही भारतीय समाज प्रबोधनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. सृष्टीला नष्ट होऊ द्यायचे नसेल तर मात्र आता बुद्धाला स्विकारलेच पाहिजे. बुद्ध विचारात जगाला तारण्याची शक्ती आहे. याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील उद्घाटनपर मार्गदर्शन करताना म्हणाले की, व्यवस्थेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण मा-याच्या जागा काबीज केल्या पाहिजेत. दैववादाला बळी पडणारे उच्च शिक्षित सुद्धा समाजाला उन्नती कडे घेऊन जाऊ शकणार नाहीत. विदेशवारी पूर्ण करून आलेल्यांच्या सत्काराप्रित्यर्थ मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध विचार वृद्धींगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन केले होते.

याप्रसंगी प्राचार्य विलास कटारे म्हणाले की, युद्धावर बुद्ध हाच एकमेव उपाय आहे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, जपान हे छोटेसे राष्ट्र आहे ज्यांनी हिरोशिमा व नागासाकी वरील अणू हल्ल्यात बेचिराख झाल्यावर सुद्धा बुद्ध तत्त्वज्ञानामुळे अल्पावधीतच फिनिक्स पक्षा प्रमाणे भरारी घेतली आहे. टी. एन. थोरात म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी घोषणा येवले मुक्कामी केली होती. गोविंद कांबळे म्हणाले की, बुद्ध ही एक अवस्था आहे, ती आपण ती आपण मिळविली पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, लॅटरल पद्धतीने पदे भरण्यावर प्रतिबंध आणला पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक एड. विलास रामटेके व आभार गोविंद कांबळे यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी दीक्षा आम्हा दिली भिमाने हे गीत म्हटले तर गोविंद कांबळे यांनी चला निळ्या पाखरांनो नागसेनवनाकडे हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, महादेव डांबरे, टी. एन. थोरात, प्रा. विलास कटारे, गोविंद कांबळे, रमाबाई कांबळे, विराज कांबळे, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.